# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 June 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १४ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- नीट परीक्षेतले वाढीव गुण रद्द-संबंधित विद्यार्थ्यांसमोर पुनर्परीक्षेचाही पर्याय
- महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी सुनेत्रा पवार यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा
- नागपूर जिल्ह्यात फटाका कारखान्यात भीषण स्फोट-सहा जणांचा मृत्यू
- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण स्थगित

आणि

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या तीन हजारावर विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक पदवी प्रदान

****

वैद्यकीय प्रवेशासाठीची राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा - नीट मधल्या एक हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क-वाढीव गुण रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. वाढीव गुण कपात किंवा पुनर्परीक्षा असे दोन पर्याय या परीक्षार्थ्यांना देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारनं काल सर्वोच्च न्यायालयात ही माहिती दिली. २३ जून रोजी नियोजित असलेल्या या पुनर्परीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाईल, असंही सरकारनं सांगितलं. वाढीव गुण पडताळणीसाठी स्थापन समितीच्या शिफारसींनुसार सरकारनं हा निर्णय घेतला आहे. नीट संदर्भात प्रवेशासाठीचं समुपदेशन थांबवण्यास न्यायालयानं काल पुन्हा एकदा नकार दिला.

दरम्यान, नीट परीक्षेदरम्यान पेपरफुटी झाली नसून, कोणताही भ्रष्टाचार किंवा गैरप्रकार झाला नसल्याचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे.

****

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून अजित डोवाल यांची, तर पंतप्रधानांचे सल्लागार म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी अमित खरे आणि तरुण कपूर यांची नियुक्ती झाली आहे. पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी डॉक्टर पी. के. मिश्रा यांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निवड समितीनं या नियुक्त्यांना मंजुरी दिल्यानंतर यासंदर्भातलं पत्रक काल जारी करण्यात आलं.

****

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय साक्ष हे तीन नवीन फौजदारी कायदे एक जुलै २०२४ पासून लागू होत आहेत. या नवीन कायद्यांबद्दल "एनसीआरबी संकलन ऑफ क्रिमिनल लॉज" या ॲपवरुन अधिक माहिती जाणून घेता येईल. गूगल प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअर वर हे ॲप उपलब्ध आहे. नवीन फौजदारी कायद्यांची संपूर्ण माहिती एकाच ठिकाणी देणारं हे ॲप सर्वसमावेशक मार्गदर्शक म्हणून काम करत आहे.

****

महाराष्ट्रातून राज्यसभेच्या एका जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचा एकमेव अर्ज आल्यानं सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणीही नाराज नाही, सर्वांच्या सहमतीनं सुनेत्रा पवार यांची राज्यसभेसाठी निवड करण्यात आल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केलं.

****

विधानपरिषदेच्या मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवसेनेनं शिवाजी शेंडगे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. पक्षाचे काल यासंदर्भातलं पत्रक जारी केलं. विधानपरिषदेच्या चार जागांसाठी येत्या २६ तारखेला निवडणूक होणार आहे.

****

नागपूर जिल्ह्यात हिंगणा तालुक्यातल्या धामणा इथं काल फटाका कारखान्यात भीषण स्फोट होऊन सहा जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. जखमींवर नागपूर इथल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत देण्यात येईल, असं सांगितलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी गेल्या सहा दिवसांपासून सुरु असलेलं उपोषण काल मागे घेतलं. सरकारी शिष्टमंडळानं काल आंतरवाली सराटी इथं जाऊन जरांगे यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला. या शिष्टमंडळात छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे, मंत्री शंभुराज देसाई, आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा समावेश होता. मराठा समाजाला आरक्षण देताना सगेसोयरेसंदर्भातली अंमलबजावणी करण्याची जरांगे यांची मागणी असून, सरकारला एक महिन्याचा वेळ द्यावा, या काळात मागण्यांबाबत निर्णय घेण्यात येईल, असं आश्वासन या शिष्टमंडळानं दिलं. यावर सहमती दर्शवत जरांगे यांनी उपोषण मागे घेतलं.

****

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा २१ मराठी चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांचा समावेश आहे. उद्यापासून हा महोत्सव सुरु होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सार्वनिक कौर यांचा अगेन्स्ट द टाइड हा चित्रपट आहे. तर राष्ट्रीय स्पर्धेत बिगारी कामगार, भैरवी, भगवान, गुंतता हृदय हे, वूमन ऑफ बिलियन, फेरा, आजोबांचं घर, वैद्यराज, अद्वैताच्या पाऊलखुणा, सहस्त्रसूर्य सावरकर, डोमकावळा - द रावन, भेड चाल, म्हातारा डोंगर या लघुपट-माहितीपटांचा समावेश आहे.

****

मराठवाड्याच्या अत्यंत वैभवशाली आणि प्राचीन परंपरांचा वारसा पुढे नेण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमातून होत असल्याचे गौरवोद्गार, राज्यपाल रमेश बैस यांनी काढले. विद्यापीठाच्या ६४व्या दीक्षांत समारंभात काल राज्यपाल दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. कुलगुरु डॉ.विजय फुलारी, प्र-कुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मराठवाड्यातला शेतकरी बदलत्या हवामानामुळे त्रस्त झाला आहे, ही भूमी पाण्याच्या बाबतीत आत्मनिर्भर व्हावी, यासाठी विद्यापीठानं पाणी या विषयावर अधिक भर देऊन लोकांचं जीवनमान उंचवावं, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

या समारंभात तीन हजार ४२ विद्यार्थ्यांना पदवी, तर ४१ जणांना पीएचडी प्रदान करण्यात आली.

****

स्लोवेनिया इथं झालेली घोडेस्वारी विश्वचषक स्पर्धा भारताच्या श्रृती वोरा हिनं जिंकून इतिहास घडवला आहे. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिलीच भारतीय ठरली आहे. श्रृतीने या स्पर्धेत ६७ पूर्णांक सात सहा गुण मिळवत अव्वल स्थान पटकावलं.

****

भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिनं जागतिक कनिष्ठ बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. गांधीनगर इथं झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दिव्याने बल्गेरियाच्या बुद्धिबळपटूचा पराभव केला.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडनं ओमानचा आठ गडी राखून पराभव केला. मध्यरात्रीनंतर झालेल्या या सामन्यात ओमाननं दिलेलं ४७ धावांचं लक्ष्य इंग्लंडच्या संघानं अवघे तीन षटकं आणि एका चेंडूत पूर्ण केलं. या स्पर्धेत सध्या अफगाणिस्तान आणि पापुआ न्यू गीनी यांच्यात सामना सुरु आहे.

काल वेस्ट इंडिजनं न्यूझीलंडचा १३ धावांनी पराभव केला, तर बांग्लादेशनं नेदरलँड्सचा २५ धावांनी पराभव केला.

****

आषाढी एकादशी निमित्त संत गजानन महाराजांच्या पालखीनं काल शेगाव इथून काल पंढरपूरकडे प्रस्थान केलं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल शेगाव इथं गजानन महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांशी संवाद साधून, पालखीला मार्गस्थ केलं.

****

जादा दराने बियाणे विक्री केल्याबद्दल हिंगोली जिल्ह्यात आखाडा बाळापूर इथल्या एका कृषी सेवा केंद्राचा परवाना सात दिवसांसाठी निलंबित करण्यात आला आहे. जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी कृषी निविष्ठांच्या गुणवत्ता तसंच उपलब्धतेबाबत काही तक्रार असल्यास तात्काळ कृषी विभागाच्या भरारी पथकाशी संपर्क साधावा, असं आवाहन, जिल्हा कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केलं आहे.

****

बोंड अळीपासून संरक्षित असलेल्या आणि कृषी विभागानं शिफारस केलेल्या तसंच कमी कालावधीत परिपक्क होणाऱ्या बीटी कापूस वाणांची लागवड करण्याचं आवाहन, नांदेड जिल्हा कृषी अधीक्षकांनी केलं आहे. पेरणी करतानाच आपल्या कपाशीवर बोंड अळी येणार नाही याची काळजी शेतकऱ्यांनी घ्यावी, असंही त्यांनी सूचित केलं आहे. एका गावात एकाच वाणाची लागवड झाल्यास किड नियंत्रण करणं आणखी सोपं होत असल्याची माहितीही कृषी विभागानं दिली आहे.

****

शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारली जात असल्याचा आरोप करत, काल छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं. शहरातल्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या विभागीय कार्यालयासमोर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झालं.

****

जागतिक बाल कामगार दिनानिमित्त हिंगोली इथं काल जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बालकांच्या काळजी आणि संरक्षणाच्या दृष्टिकोनातून बाल कामगार कायदा, बाल हक्क आणि संरक्षण, बालविवाह कायदा याबाबत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी माहिती दिली.

****

बीड जिल्ह्यात सामाजिक सलोख्याचं वातावरण अबाधित रहावं, यासाठी जिल्हा पोलिस दलाकडून काल बीड शहरात सद्भावना रॅली काढण्यात आली. विविध सामाजिक पक्ष संघटनेचे, तसंच समाजकार्य क्षेत्रातले मान्यवर, विद्यार्थी, पोलीस प्रशासनातले अधिकारी या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

****

परभणी जिल्ह्यात काल संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे शेती कामांना वेग येईल तसंच गरवा निर्माण झाल्याने उकाड्यापासून दिलासा मिळाला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

रायगड जिल्ह्यात अलिबाग इथं पर्यटनासाठी गेलेल्या छत्रपती संभाजीनगर इथल्या तरुणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. अविनाश शिंदे असं या तरुणाचं नाव असून, तो आळंदी इथं खासगी कंपनीत नोकरी करत होता.

✻✻✻✻

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या तीन चार दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं पुणे वेधशाळेनं सांगितलं आहे.

✻✻✻✻